सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक- सीसीटी-३६१७/ प्र. क्र.२/ भाग-२/ १२४६२५८/ पोल-३, दि.२२/०९/२०२५

**विषय** :- राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी येणा-या रु.५० कोटी इतक्या निधीच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक. सीसीटी-३६१७/ प्र. क्र.२/ भाग-२/ १२४६२५८/ पोल-३, दि.२२/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९२२१७२४१८३६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 27-09-2025 19:43:53

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी येणाऱ्या रु.५० कोटी इतक्या निधीच्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

शासन निर्णय क्रमांकः सीसीटी - ३६१७/प्र.क्र.२/भाग-२/१२४६२५८/पोल-३

गृह विभाग, २ रा मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : **२२.९**.२०२५

<u>वाचा</u> -

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीओएम-१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दि.०५.१०.२००१, दि.०५.१०.२००२, दि.०५.११.२००२ व दि.०५.०८.२००५.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्र. गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्थापना-२, दि.२०.०५.२०१५.
३. शासन निर्णय, गृह विभाग क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ), दि.०२.०६.२०१६, दि.२२.०३.२०१७ व दि.२०.०७.२०१७.
४. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १०.११.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१७/प्र.क्र.२/पोल-३, दि.०५.०६.२०१७, दि.०३.०२.२०१८ व दि.१२.११.२०१८. दि. २३ सप्टेंबर, २०२२
६. महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी झालेला करार.
७. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) क्र.३२८४/२०१८, दि.११.१२.२०१८ चे कार्यादेश.
८. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.अपोमसं(वा.)/४५/नियोजन/ई-चलान/२६२०/२०२५, दि.२३.५.२०२५.
९. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १५.११.२०१७, दि.१३.०५.२०१९, दि.१४.०८.२०१९, दि.१३.०७.२०२२ व दि.१९.६.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना</u> -

शासन निर्णय, गृह विभाग दि.०२.०६.२०१६ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीची पुनर्रचना करण्यात आली. तसेच शासन निर्णय, गृह विभाग दि.२२.०३.२०१७ अन्वये उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या कार्यकक्षामध्ये गृह विभागातील सर्व तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन त्यामुळे वाहतुक कोंडी व इतर समस्या निर्माण होत आहेत. वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडुन दंड वसुलीदरम्यान वाहतुक पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वाहतुक समस्यांवर अंकुश ठेवणे व कसुरदार व्यक्तींवर प्रभावी तथा पारदर्शकपणे कारवाई करण्यासाठी राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.५९,१२,३१,५०७/- (रुपये एकोणसाठ कोटी बारा लाख एकतीस हजार पाचशे सात फक्त) इतक्या निधीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता गृह विभाग, शासन निर्णय दि.०३.०२.२०१८ नुसार देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, गृह विभाग दि.०३.०२.२०१८ अन्वये ई-चलान प्रकल्पासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी व देखरेख करण्यात येत आहे.

ई-चलान प्रकल्पाच्या निविदा प्रक्रीयेतुन पात्र ठरलेल्या पुरवठादाराच्या निवडीस उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने दि.०७.०९.२०१८ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांचे दरम्यान दि.११.१२.२०१८ रोजी पाच वर्षांचा करार करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्र.७ येथील पत्राद्वारे मे.टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना कार्यादेश देण्यात आले आहे. ई-चलान प्रकल्प कराराच्या तरतुदीप्रमाणे पुरवठादार मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड यांना प्रत्येक ई-चलान व्यवहाराकरिता याप्रमाणे प्रत्येक तिमाहीकरिता रक्कम देय आहे.

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र.८ येथील पत्रान्वये वन स्टेट वन ई चलान प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीचे (PIC) इतिवृत्त सादर केले होते. त्यानुसार अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या (HPC) दि.१३.०७.२०२२ रोजीच्या बैठकीत ई-चलान प्रकल्पासाठी येणाऱ्या रु.९० कोटी इतक्या अतिरिक्त निधीच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्तीच्या (Operation & maintenance) प्रस्तावास मान्यता देण्यात आली व त्यानुसार एकूण रु.१४९ कोटी इतक्या निधीच्या खर्चास मान्यता दि.२३.९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्याबाबत अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१९.०६.२०२५ रोजीच्या बैठकीत Administrative Approval of Rs.50 Crore Budget for One State One eChallan Project याबाबत झालेल्या चर्चेदरम्यान (3) The Committee has granted Administrative Approval of Rs.50 Crores for the One State One eChallan Project. असा निर्णय घेण्यात आला.

वरीलप्रमाणे उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत The Committee has granted Administrative Approval of Rs.50 Crores for the One State One eChallan Project. अशी देण्यात आलेली मान्यता विचारात घेता सदर प्रकल्प राबविण्यासाठी येणाऱ्या रु.५० कोटी इतक्या निधीच्या ई-चलान प्रकल्पाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** -

शासन निर्णय, गृह विभाग दि.०२.०६.२०१६ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीने दि.१९.०६.२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार राज्यात ई-चलान प्रकल्पाच्या कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी (Operation & maintenance) येणाऱ्या रु.५० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प हा व्यवहार आधारित पध्दतीनुसार (Transaction based model) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन तसेच देखभाल व दुरुस्ती प्रकल्प संचालकाकडून (SI) करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकल्पाचे GRAS प्रणालीसोबत एकात्मीकरण करण्यात येणार असून वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेल्या ई-चलान/दंडाची रक्कम GRAS प्रणालीमार्फत शासकीय कोषागारात जमा करण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व देखरेख करण्याची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येत आहे. सदर समितीने प्रकल्पाच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

४. सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च हा "मागणी क्र.१, २०५५- पोलीस (०१) (०६), ई-चलान प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२८४), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री, तसेच १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली त्या - त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९२२१७२४१८३६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.09.22 17:24:53 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

३. मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव.

४. मा. राज्यमंत्री शहरे/ग्रामीण, गृह यांचे खाजगी सचिव.

५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.

६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग (साप्रवि), मंत्रालय, मुंबई.

९. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.

१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

११. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१२. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

१४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

१५. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१८. मे. टेलिकम्युनिकेशन्स कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड, टीसीआयएल भवन, ग्रेटर कैलास-१, नवी दिल्ली-४८.

१९. मे. केपीएमजी ॲडवायझरी सर्व्हिसेस प्रा.ली., मुंबई.

२०. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा.

२१. अर्थसं-१/गृह विभाग, मुंबई.

२२. निवडनस्ती, पोल-३.

*****